# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद

जा. क्र ४०७ /२०११-१२ दिनांक : ०८ नोव्हेंबर २०११.

**(फक्त सभासदांसाठी)**

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची इ.सन २०१०-११ (१ एपिल २०१० ते ३१ मार्च २०११) ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०११ रोजी दुपारी ३.०० वा. परिषदेचे अध्यक्ष श्री.हेमंत टकले यांचे अध्यक्षतेखाली यशवंत नाट्यमंदिर, मनमाला टँक रोड, माटुंगा-माहिम, मुंबई - ४०० ०१६ येथे होणार आहे. या सभेस उपस्थित राहून सहकार्य द्यावे, ही विनंती.

## -सभेपुढील विषय -

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून संमत करणे.
२. परिषदेच्या १ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११ या कालावधीचा वार्षिक अहवाल सादर करणे व संमत करणे.
३. परिषदेच्या १ एप्रिल २०१० ते ३१ मार्च २०११ या कालावधीचे हिशेब तपासनीसांनी तपासलेले हिशेब सादर करणे व संमत करणे.
४. इ.सन. २०११-१२ या वर्षाचे अंदाजपत्रक सादर करणे व संमत करणे.
५. इ.सन २००११-१२ या वर्षाकरिता हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
६. नाट्यसंकुल प्रगतीचा आढावा घेणे व निधीविषयी विचार करणे.
७. परिषदेच्या भावी कार्यासंबंधी विचार करणे.
८. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी आलेल्या विषयांचा विचार करणे

आपली,

(स्मिता तळवलकर)
प्रमुख कार्यवाह

## विशेष सूचना :

१. गणसंख्येअभावी ही सभा तहकूब झाल्यास पुन्हा ती सभा त्याच जागी अर्ध्या तासानंतर वरील कामकाजासाठी भरेल. या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२. ज्या सभासदांना अहवाल अगर जमाखर्चासंबंधी अधिक माहिती विचारावयाची असेल त्यांना ती माहिती दि. १५ नोव्हेंबर २०११ ते दि.२२ नोव्हेंबर २०११ पर्यंत प्रतिदिनी सायं. ४ ते ६ या वेळात परिषद कार्यालय, माटुंगा-माहिम, मुंबई - ४०० ०१६ येथे पुरविण्यात येईल.
३. वार्षिक सभेत ठराव/सूचना करावयाच्या असल्यास सूचक व अनुमोदक यांच्या सहीने ठरावासह त्या अर्थाची लेखी सूचना दि. २२ नोव्हेंबर २०११ पर्यंत परिषदेच्या कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे.
४. वार्षिक अहवाल शाखेच्या सभासदांसाठी शाखेच्या कार्यालयात, तसेच मुंबईतील सभासदांसाठी मध्यवर्ती कार्यालयात दिनांक १५ नोव्हेंबर २०११ पासून अवलोकनार्थ उपलब्ध होईल. व मागणी केल्यास उपलब्ध करुन दिला जाईल.
५. ज्या सभासदांचे पत्ते बदलले आहेत त्यांनी कृपया आपला नवीन पत्ता कळवावा.

## महत्वाचे निवेदन

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची सभासद संख्या (शाखा सभासदांसहित) पधंरा हजाराहून अधिक आहे. या सर्वांना अहवाल पाठविण्यास भरमसाठ वाढलेला टपालखर्च करणे आर्थिक तरतुदीच्या अभावी केवळ अशक्य आहे. त्यामुळे प्रतिवर्षी होणारा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा, नाट्यसंमेलन, सत्कार आणि अन्य नाट्यविषयक कार्यक्रम हे वृत्तपत्राद्वारे सभासदांना कळविण्यात येतील. सर्व सभासदांनी परिषदेला याबाबतीत सहकार्य करावे ही विनंती सभासदांनी आपली E-mail परिषदेला कळविल्यास E-mail द्वारे संबधित माहिती कळविण्याचा प्रयत्न केला जाईल.